Jun 19 2015 : MaharashtraTimes (Pune)

# पालिका शाळांसाठी ‘समर इंटर्नशिप’



समर कॅम्पमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

सीएसआयआर- एनसीएल आणि ‘आयसर’च्या वतीने नुकताच ‘समर इंटर्नशिप प्रोग्राम’ हा नवीन उपक्रम आयोजित केला गेला. या उपक्रमांतर्गत पुण्यातील महानगरपालिकेच्या हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालय, के. सी. ठाकरे विद्यानिकेतन आणि डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन या शाळेतील प्रत्येकी एक अशा तीन विद्यार्थ्यांचा समावेश प्रयोगशाळेत काम करण्याची संधी मिळाली. त्याअंतर्गत मुलांना १५ एप्रिल २०१५ ते १३ जून २०१५ या कालावधीत एनसीएल येथील प्रयोगशाळेत काम करण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे मुलांना संशोधन म्हणजे नेमके काय, शास्त्रअध्यय, प्रयोग शाळेत कसे काम करतात, पीएचडी कशा प्रकारे केली जाते, याबद्दल त्यांना जवळून ओळख झाली. या कार्यक्रमासाठी फोर्ब्ज मार्शल फाउंडेशन, प्राज फाउंडेशन आणि डीएस, एम. इंडिया यांनी या मुलांचे कौतुक केले. या वेळी मुलांनी त्यांना प्रयोगशाळेत आलेले अनुभव व्यक्त केले.